# MAHESH TUTORIALS I.C.S.E.

**ICSE X** **Marks :** 80

SUBJECT : **MARATHI**

**Exam No. :** MT/ICSE/SEMI PRELIM-I-SET A-002 **Time :** 3 hrs.

**Model Answer Paper**

## SECTION A

**A.1** Write a short composition in **Marathi** of approximately **250** words on any **one** of the following topics :

खाली दिलेल्या विषयापैकी कोणत्याही **एका** विषयावर सुमारे **250** शब्दांचा **मराठीत** संक्षिप्त निबंध लिहा.

(i) **''शिस्त आणि संस्कार''**

जर आयुष्यात यशस्वी व्हायचे असेल तर शिस्त व संस्कार हे फार महत्त्वाचे आहेत. शिस्त व संस्कार हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिस्त ही संस्कारांवर अवलंबून आहे तर संस्कार हे शिस्तीवर अवलंबून असतात. मुले ही म्हणजे जणू देवाघरचे लेणे. त्यांची मने कोमल, जणू मऊ मातीचा गोळाच! ज्याप्रमाणे शिल्पकार मातीला आकार देऊन मूर्ती बनवतो; त्याचप्रमाणे आपल्यावर चांगले संस्कार झाले तर आपण आयुष्यात खात्रीने यशस्वी होऊ शकतो. त्याचप्रमाणे आयुष्यात संकटांचा सामना करायचा असेल, आपल्याला प्रगतीपथावर जायचे असेल तर शिस्त अंगी बाणायलाच हवी.

बस मधून प्रवास करत असताना जेव्हा आपण आपल्या जागेवर एका वृद्ध माणसाला बसायला देतो ते संस्कार. आपल्यावर केलेले संस्कार हे फार गरजेचे असतात. संस्कार हे आपल्या जीवनातले एक अनमोल रत्न आहे. संस्काराने आपले मन घडते. त्याच बरोबर शिस्तीने आपले शरीर घडते. कोणते काम शिस्तीने केले की ते व्यवस्थित होते. प्रत्येक व्यक्तीमध्ये शिस्त आवश्यक आहे. कुठेही कसेही वागणे, बोलणे, आचरण करणे हे गैरशिस्तीचे होते. विदयार्थी जीवनात तर शिस्तीला अधिक महत्त्व आहे. शिस्तबद्ध वागण्याने आपण यशाची पाऊलवाट चालू शकतो.

कौरव व पांडव हया दोघांमध्ये चाललेल्या युद्धात आपल्या भावांवर शस्त्र कसे उचलावे या विचाराने अर्जुनाच्या हातातील धनुष्य खाली गळून पडले. तो संभ्रमात पडला. हे त्याचे संस्कार! पण त्याचवेळेस कृष्णाने त्याला धीर दिला हे भावंडांवर शस्त्रं उचलणे नाही तर हे धर्म - अधर्माचे युद्ध आहे. नीति-अनीतिचे युद्ध आहे. अर्जुन धर्माने क्षत्रिय आहे असे सांगून त्याला धर्मरक्षण करण्याचे कर्तव्य पार पाडण्यास सांगितले. ही आहे शिस्त.

आपल्या रोजच्याच जीवनातील एक साधे-छोटेसेच उदाहरण घ्या ना, जेवण झाले की आई आपल्याला ताट उचलायला भाग पाडते, ती शिस्त व आपण स्वत:हून ताट उचलतो ते संस्कार.

तिकीट काउंटर चे शटर वेळेवर बंद करणे म्हणजे शिस्त पण वेळ संपल्यावरही एका वृद्ध माणसाला तिकीट देणे हेच संस्कार!

आपल्या प्रत्येक कामातून, वागण्यातून ते प्रमाण बद्धतेने करण्यातून आपली शिस्त दिसून येते. काम किती, कसे चोखपणे केले आहे हे शिस्त पडताळून पाहते तर आपले वागणे, आचरण यातून आपले संस्कार दिसतात.

आपल्या प्रत्येक कृतीतून संस्कार व शिस्त दिसते. त्यातूनच आपल्या माता-पित्यांचेही आचरण कळते. कारण 'खाण तशी माती' असे म्हटले जाते. मुले जे बघतात, ऐकतात तसेच वागतात. आपणही आपल्या आचरणातून आपल्या पालकांचे नाव गौरविले पाहिजे. म्हणूनच संस्कार व शिस्त दोन्ही फार महत्त्वाचे आहेत. भारतासारख्या देशाला प्रगती करण्यासाठी शिस्त व संस्कार हे खूप गरजेचे आहेत. **[15]**

(ii) **आज शिवाजीराजे असते तर ------- कल्पना विस्तार करा.**

**मुद्दे :** दूरदर्शनवरील वीर शिवाजी मालिका बघत असताना मनात उदात्तभाव दाटणे - नतमस्तक होणे - सध्याच्या परिस्थितीत कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाची उणीव भासते तेव्हा भूतकाळातील कर्तव्यकठोर थोर व्यक्तीची प्रकर्षाने आठवण होते - आज देशाची आंधाधुंदी - देश अस्तव्यस्त - मनात विचार - आज शिवाजीराजे असते तर .... !

राजांना राजकारणातील शहाणपणा होता - परकीय शत्रूंचा बंदोबस्त - स्वतंत्र राज्य निर्माण - आज पाकिस्तान, चीन, अफगाणिस्तान या शत्रूंचा बंदोबस्त केला असता.

राजे प्रजाहितदक्ष - अन्यायाची, भ्रष्टाचाराची चीड - कडक शासन - आज असते तर भ्रष्टाचाराला आळा बसला असता राजांनी स्त्रियांना मान दिला - संरक्षण दिले - आधुनिक स्त्री समर्थपणे वावरते पण अत्याचार सहन करते - निर्भयता लाभली असती - वाईट वर्तन करणाऱ्याला हातपाय तोडण्याची शिक्षा देण्यास मागेपुढे पाहिले नसते.

धर्मनिष्ठ राजे आजच्या विज्ञान युगात असते तर ढोंगी माणसे बस्तान बसवू शकली नसती. राजांचे स्वभाषेवर प्रेम - मराठी भाषेचा माजलेला गोंधळ झाला नसता - लष्कर, आरमार, हवाईदल या संरक्षणाच्या फळ्या अत्याधुनिक ठेवल्या असत्या - भारताने स्वीकारलेली लोकशाही, धर्मनिरपेक्षता यांचे खरे पालन - भ्रष्टाचारविरहित व्यवहार - सांस्कृतिक वारशांचे जतन.

आजच्या अंधारयुगात या पुण्यवान महामानवाने अवतार घ्यावा असे वाटते - त्याचबरोबर आपण सुद्धा शिवाजीराजांची नीतिमूल्ये आचरणात आणावी म्हणजे खऱ्या अर्थाने 'सुराज्य' बनेल. महाराजांना धन्य धन्य वाटेल असे कार्य करण्याची प्रत्येकाने शपथ घ्यावी. **[15]**

(iii) **'ऐकावे जनाचे करावे मनाचे,'**

**मुद्दे :** सर्वांचा विचार घ्यावा व आपणांस योग्य वाटेल ते करावे. माणूस समाजप्रिय प्राणी - विचारांची देवाणघेवाण - विचारविनिमय - व्यक्ती तितक्या प्रकृती - प्रत्येकजण आपल्या डोक्याने, विचाराने मत मांडणार - दुसऱ्याच्या मतांना, विचारांना मान द्यावा पण होय म्हणून मान न डोलवणे.

मनुष्यप्राणी - बुद्धिमत्ता - सारासार विचार करण्याची शक्ती - अनेकांच्या मतांतून विचारांना चालना - अनेक बाजू पडताळून पाहता येणे - त्यातून सारासार विचार करणे व यथायोग्य मत मांडणे - योग्य - अयोग्य बाजूंनी विचार करून आपले निर्णय ठरविणाराच शहाणा माणूस- (विद्यार्थ्यांनी याबाबत आपला स्वतःचा अनुभव आपल्या शब्दांत मांडावा किंवा गोष्ट लिहावी.) **[15]**

(iv) **स्त्री भ्रूणहत्या**

''यत्र नार्यस्तू पूज्यन्ते। रमन्ते तत्र देवता।।''

जेथे नारीची, स्त्रीशक्तीची पूजा केली जाते तेथे देवतांचा निवास असतो. संपूर्ण चराचराला व्यापून राहिलेल्या मातृरुपेण निर्माण शक्तीच संपूर्ण भारतभर पूजली जाते. अनादी काळापासून भारतीय लोकमन स्त्रीदेवतेच्या अनेकविध शक्तीची उपासना करीत आले आहे. संरक्षक दुर्गामाता, संहारक कालीमाता, संघर्षरत रणचंडी व विद्यादायिनी सरस्वती, धनलाभ करणारी लक्ष्मीमाता, शांतरुपिणी महालक्ष्मी व मुंबईची मुंबादेवी अशा विविध रुपात ती पूजनीय आहे. तरीही याच समाजात स्त्री अबला कशी झाली? आपण स्त्रीला देवता मानतो ते काय फक्त मूर्तीरुपातच का? प्रत्यक्षात मात्र तिची उपेक्षाच केली जाते.

मुलीच्या जन्माला तर नाके मुरडली जातात. 'मुलगीच झाली का ?' असे कुत्सितपणे विचारले जाते. मुलगी म्हणजे उरावरची धोंड म्हटले जाते. आधी लहानपणी आई-बापांच्या आज्ञेत वागायचे, मोठा भाऊ असेल तर त्याच्या दबावाखाली वावरायचे, सासरी गेल्यावर पतीच्या इशाऱ्यावर नाचायचे, म्हातारपणी मुलांच्या तालावर डोलायचे! का, किती उपेक्षा सहन करायची

स्त्रीने? या उपेक्षेचा अतिरेक म्हणजे 'स्त्री भ्रूण हत्या'! स्त्री संततीच्या जन्मावरच बंदी! भारतातील आदीशक्ती देवतांचे महात्म्य आणि प्रत्यक्ष स्त्रीचे जीवन यातील हा विरोधाभास खरोखरच घृणास्पद आहे.

मुलगा जन्माला आला तर कृतकृत्य वाटते. मुलगा म्हणजे म्हातारपणाची काठी, वंशाचा दिवा अशी आजही अपूर्वाईची गोष्ट मानली जाते. घराण्याचे नाव चालवणारा, पित्याला स्वर्गप्राप्ती करणारा अशा कितीतरी भ्रामक विचारांमुळे पुरुषजात जन्मजात श्रेष्ठ आहे असा समज दुर्दैवाने आजही आहे. मुलगा जन्माला येणे म्हणजे पुण्य कर्म. पुरुषाचे महान कर्तृत्व. पण मुलगी जन्माला येणे म्हणजे पापाचे धनी. त्या सुनेचा वाईट पायगुण, तिच्याचमुळे मुली जन्माला येत आहेत. तिच वाईट, अवलक्षणी असे मानले जाते. मुलगी म्हणजे नकोशा गोष्टीवर केलेला खर्च असे समीकरण आजही मानले जाते.

आजचे युग विज्ञानाचे युग आहे. नित्य नवे आविष्कार जन्मास येतात. सोनोग्राफी मशिन हा त्याच आधुनिक विज्ञानाचा अविष्कार होय. मातेच्या उदरातील बाळाच्या आजारावर, व्यंगावर उपाय करता यावेत असा अविष्कार. त्यातून बाळाचे लिंगही समजते. मग काय! घाला मुलींवर घाला! आपल्या स्वार्थासाठी या गोष्टीचा फायदा समाजकंटक करतात. 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ!' अशी आपली पद्धत आहे.

२०१० च्या जनगणनेच्या अहवालानुसार दरहजारी मुलींचे प्रमाण पंजाबमध्ये ८९३, हरयाणात ८७७, उत्तर प्रदेशात ९०८ तर महाराष्ट्रात ८३३ एवढे आहे. लोकसंख्येचा भस्मासूर आपल्या भारत देशाच्या प्रगतीत सर्वात मोठा अडसर असतानाही मुलीच्या संख्येची आकडेवारी चिंताजनक आहे. त्यासाठी लिंगविषमता किंवा मुलगा-मुलगी हा भेदभाव असताच कामा नये.

२००३ मधील गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायदयात सुधारणा करून गर्भलिंग निदान करणाऱ्यावर ३ वर्षे कैद व रु. ५०,०००/- दंडाची तरतूद करण्यात आली आहे. प्रकृतीचा समतोल साधण्यासाठी स्त्री व पुरुष दोन्ही समान प्रमाण असले पाहिजे. संसाराच्या रथाच्या चक्राची दोन्ही चाके सारखी हवीत. मुलींचे आजचे घटते प्रमाण हे उदयाच्या विवाहसंस्थेवर, कुटुंबसंस्थेवर, स्त्रीपुरुषांच्या सामाजिक जगण्यावर दुष्परिणामकारक ठरेल यात वादच नाही. मुलगा हा आपला वंश चालवण्यासाठी हवा आहे ना, मग त्या आपल्या कुलदीपकाला, वंशाच्या दिव्याला जोडीदारीण, सहचारिणी मिळायला मुलगी नको का? याचा तरी विचार समाजाने करावा.

कोमल मनाच्या, सहृदय, दयावान, प्रसंगी खंबीरपणे आई-बापांचा भार झेलणारी, पतीला संसारात साथ देणारी मुलगी जन्माला यायला नको का ? डॉ. आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, झाशीची राणी, इंदिरा गांधी, कल्पना चावला, पी.टी. उषा, प्रतिभाताई पाटील, किरण बेदी, हेमामालिनी, जगन्माता अम्माजी, मदर तेरेसा, साधनाताई आमटे, कवयित्री वंदना विटणकर, शांता शेळके, लता मंगेशकर या साऱ्या दिग्गजांच्या जोडीला त्यांच्या आशीर्वादाने आयुष्य तेजस्वी करणारी कन्या जन्माला यायलाच हवी. प्राचीन काळातील गार्गी, मैत्रेयी सारख्या विदूषींनी पुन्हा आपल्या घरात जन्म घ्यायलाच हवा.

मुलगी म्हणजे हळूवार वाऱ्याची झुळूक, प्रेमाचा वर्षाव करणारी. या स्त्रीच्या जन्माची नाकेबंदी थांबवायलाच हवी. यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यायला हवा. अंधश्रद्धा, अंधविश्वासाला दूर करायलाच हवे. अन्यथा आपलीच करणी आपल्याला भोवेल. हा निसर्ग कदाचित माणसाच्याच अस्तित्वाची नाकेबंदी करेल. मग कुणाकडे दाद मागणार आपण ? **[15]**

(v) **मुद्दे :** अवघा महाराष्ट्र दुष्काळ व तीव्र पाणी टंचाईच्या संकटाच्या विळख्यात अडकला आहे - टँकरसाठी लागलेल्या लोकांच्या रांगा - कोरड्या विहिरी - धरण - तलावामध्ये रोडावलेला पाणीसाठा - बायाबाप्यांची पायपीट - हा दुष्काळ, पाणीटंचाई अचानक उद्भवत नाही - देशाच्या मध्य व पश्चिम भागात दुष्काळ व पाणीटंचाईची तीव्रता वाढत आहे.

औद्योगिकीकरण, शहर विकास या कारणांसाठी हिरवा जैवभार बाळगून असणारी शेतजमीन अवाढव्य प्रमाणात नष्ट केली जाते - कागदोपत्री २३ टक्के वनक्षेत्र असले तरी प्रत्यक्ष वनांनी व्यापलेले क्षेत्र १९टक्के एवढेच आहे. त्यामुळे हवेतील, जमिनीतला ओलावा नष्ट - औद्योगिकीकरण, खाणकाम, बांधकाम - विविध कारणांमुळे जमिनीचे अधिग्रहण, पाण्याचा अतिरिक्त उपसा यामुळे सुपीक जमीन नापीक - यावर उपाय - लोकांनी संघटीत होऊन जल, जंगल, जमीन यांच्या रक्षणाच्या लढाईत उतरावे. [15]

**A.2** Write a letter in Marathi of approximately **120** words on any one of the topics given below :
खालील दिलेल्या विषयांपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे **120** शब्दांपर्यंतचे एक पत्र **मराठीत** लिहा :

(i) प्रति,
मा. पोलीस निरीक्षक,
रामनगर पोलीस स्टेशन,
मुलुंड (प.)
मुंबई - ४०००८०.
दि. १९ नोव्हेंबर, २०१५

विषय : वाढत्या चोऱ्यांबद्दल तक्रार.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क. रामनगर, मुलुंड (प.) विभागातील ‘आशा’ हाऊसिंग सोसायटीचा रहिवासी आहे. आमच्या भागातील वाढत्या चोऱ्यांकडे व धोक्यांकडे आपले लक्ष वेधून घेऊ इच्छित आहे. एक नागरिक या नात्याने माझे कर्तव्य आहे की, मी या भागात होणाऱ्या अराजकतेच्या घटनांशी आपणास परिचित करावे.

गेल्या काही दिवसांपासून महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्र, चेन ओढणे, खांद्यावरील पर्समधून पैसे काढणे, रस्त्यांवर मुलींची छेडछाड करणे, दुकानदारांकडून बळजबरीने हप्ते वसूल करणे, भुरट्या चोऱ्या करणे, धमक्या देणे अशा घटना रोज घडत आहेत. लोक बाहेर जाण्यास घाबरत आहेत. वृद्ध व महिलांना याचा सर्वाधिक त्रास होतो.

आपणास विनंती आहे की, याबाबत आपण उचित कारवाई करून नागरिकांची मदत करावी. आम्ही नागरिकही आपणास सर्व प्रकारची मदत करण्यास तयार आहोत. आमच्या भागात रात्रीच्यावेळी पोलीस गस्त पुरेशी नसते. तेव्हा कृपया दुपारी व रात्री पोलीस गस्त ठेवावी. तुमच्या द्वारे केल्या जाणाऱ्या कारवाईबद्दल प्रत्येक नागरिक आपला कृतज्ञ राहील. आशा आहे आपण योग्य ती कारवाई कराल.

तसदीबद्दल क्षमस्व.

आपला कृपाभिलाषी,
अ.ब.क.
४००/ बी, ‘आशा’ हा. सो,
रामनगर, मुलुंड (प.)
मुंबई - ४०००८०. [7]

| | | |
|---|---|---|
| (ii) | अ.ब.क.<br>महसुल कॉलनी,<br>कोल्हापूर.<br>दि. ११ जानेवारी, २०१५<br>प्रिय मैत्रीण आर्या,<br>सप्रेम नमस्कार,<br>तुझे पत्र मिळाले वाचून आनंद झाला. मला पत्राचे उत्तर पाठवायला उशीरच झाला पण राग मानू नको.<br>माझ्या वाढदिवसासाठी यावर्षीही मला अनेक भेटकार्ड व वस्तू मिळाल्या. तू सुद्धा दरवर्षी न विसरता मला शुभेच्छा देतेस. पण यावर्षीचा माझा वाढदिवस केवळ तुझ्यामुळेच अविस्मरणीय ठरला आहे. तू स्वतःच्या हाताने काढलेले माझे चित्र मला भेट पाठविलेस. खरंच ते इतकं सुंदर दिसत होतं की मी स्वतःकडे एका वेगळ्याच सकारात्मक दृष्टीने पाहू लागले. त्यात भरलेले रंग, त्या चित्रात इतका जीवंतपणा होता की, जणू मी आरशातच पाहते की काय असे वाटू लागले. इतकी सुंदर भेटवस्तू यापूर्वी मला कुणीच दिली नव्हती. त्याबद्दल मनापासून धन्यवाद. मी आयुष्यभर तुझी भेटवस्तू जीवापाड जपेन.<br>तुझ्या आई व बाबांना साष्टांग नमस्कार व छोट्या पिंकीला आशीर्वाद. उत्तराची वाट पाहत आहे.<br>तुझी मैत्रीण,<br>अ.ब.क.<br>प्रति,<br>आर्या भागवत<br>मु.पो. मानवत,<br>जिल्हा - परभणी. | [7] |
| **A.3** | Read the passage given below and answer in Marathi the questions that follow, using your own words as far as possible :<br>खालील उतारा काळजीपूर्वक वाचा आणि त्यावर आधारलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या स्वतःच्या शब्दांत लिहा : - | |
| (i) | अनाथाश्रमातून घरी आणलेल्या मुलीला 'स्पेशल पाहुणी' म्हटले आहे. अनाथाश्रमातून आणलेली मुलगी म्हणजे अर्थातच तिला घर, आई वडील कोणी नव्हते. ती अनाथ होती. घरपण, प्रेम या गोष्टी तिने अनुभवल्या नव्हत्या. ती यासाठी नवखी होती. परक्यांच्या घरात जाणे, त्यांचे घर, कुटुंब पाहून ती लहान मुलगी बुजत होती. | [2] |
| (ii) | दिवाळी दिव्यांचा सण आहे. घरात पणत्या लावून आपण झगमगाट करतो. आनंद व्यक्त करतो. आपण इतरांच्या जीवनातही प्रकाश आणून त्यांना आनंद देऊ शकतो. अनाथ मुलीला काही काळ का होईना लेखिकेच्या आईने आनंदाचा प्रकाश दिला. तिला घराचे, कुटुंबाचे प्रेम लाभले म्हणून त्यावर्षीची दिवाळी आगळीवेगळी होती. | [2] |
| (iii) | दिवाळीला घरी आलेल्या त्या मुलीने ताई व दादाला एक मोरपिस व सुकलेले गुलाबाचे फूल दिले. आपल्याकडे जे आहे ते इतरांना द्यावे. इतरांच्या प्रेमाची परतफेड प्रेमाने करावी हे आपण त्या मुलीकडून शिकायला मिळते. प्रेम घ्यावे व प्रेम द्यावे हे गुण दिसतात. | [2] |

| | | |
|---|---|---|
| (iv) | साधारण सहा वर्षांनी लेखिकेकडे एक आमंत्रणपत्रिका व पत्र आले. त्या मुलीने तिच्या जीवनप्रवासाविषयी एक पुस्तक लिहिले होते. ते तिने आईला अर्पण केले होते. अनाथ मुलीला आईचे प्रेम दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली होती. नाती फक्त रक्ताचीच असतात असे नव्हे तर प्रेमाचेनाते, किंबहुना अशा नात्याचे प्रेम अधिक घट्ट असू शकते. | **[2]** |
| (v) | विद्यार्थ्यांनी आपला अनुभव लिहावा. | **[2]** |
| **A.4** | Answer the following according to the instructions given :<br>खाली दर्शविल्याप्रमाणे प्रश्नांची उत्तरे लिहा : | |
| (अ) | **खालील म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** | |
| | (i) चोराच्या उलटच्या बोंबा - स्वत:च गुन्हा करून दुसऱ्याच्या नावाने ओरडणे.<br>वाक्य - स्वत: मारामारी, भांडण करुन आईने विचारल्यावर जोरजोरात रडून अभयने गोंधळ घातला. म्हणतात ना, चोराच्या उलटच्या बोंबा ! | **[1]** |
| | (ii) गरज सरो वैद्य मरो - आपले काम झाल्यावर कृतघ्न बनणे.<br>वाक्य - निलेश आजारी होता तेव्हा अभ्यास पूर्ण करण्यासाठी मित्रांची गरज लागली. गरज संपल्यावर मात्र गरज सरो वैद्य मरो असे मित्रांशी त्याने वागणे सुरु केले. | **[1]** |
| | (iii) नाकी नऊ येणे - प्राण कासावीस होणे.<br>वाक्य - रायगड चढून जाताना आमच्या नाकी नऊ आले. | **[1]** |
| (आ) | **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. (कोणतेही दोन)** | |
| | (i) अवकळा येणे - वाईट परिस्थिती येणे.<br>वाक्य - वर्षानुवर्षे किल्ल्याची काळजी, डागडुजी न केल्यामुळे किल्ल्याला अवकळा आली होती. | **[1]** |
| | (ii) आगीत तेल ओतणे - भांडणात भर घालणे.<br>वाक्य - भांडणे मिटवण्यापेक्षा आगीत तेल ओतण्याची काहीजणांना सवय असते. | **[1]** |
| | (iii) सपाटा लावणे - एकच गोष्ट सतत करणे.<br>वाक्य - आंबे आणल्यावर ते खाण्याचा मी सपाटा लावला. | **[1]** |
| (इ) | **कंसातील सूचनेनुसार बदल करून वाक्य पुन्हा लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | (i) आम्ही बाहेर गेलो होतो **म्हणून** अभ्यास केला नाही. | **[1]** |
| | (ii) **अबब** ! केवढा मोठा साप ! | **[1]** |
| | (iii) मातृभुमी**पेक्षा** श्रेष्ठ असे काय आहे ? | **[1]** |
| (ई) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | |
| | (i) मार्गदर्शक | **[1]** |
| | (ii) दीपस्तंभ | **[1]** |
| | (iii) आपादमस्तक | **[1]** |

## SECTION - B (40 Marks)
## कथाकुंज

A.5 Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**बेघर**

(i) मुलगा म्हणजे वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी असे मानले जाते. सुधाताईंनी आपल्या एकुलत्या एक मुलाला तळहातावरील फोडाप्रमाणे जपले. त्याचं खाणंपिणं, त्याची तब्येत, छंद, अभ्यास, आवडीनिवडी हेच आपले आयुष्य व सुख आहे असे मानले. मुलाचे लग्न लावून दिले. सून-प्रमिला घरी आली. घर म्हटले म्हणजे भांडयाला भांडे लागणार. एकत्र कुटुंब म्हणजे सगळयांनी जुळवून घ्यायलाच हवे.

पण प्रमिलाला स्वातंत्र्य हवे होते. स्वत:चे निर्णय स्वत: घ्यायचे, बंधनमुक्त जीवन जगायचे होते. सासूचे वर्चस्व नको होते. तिने भावाच्या मदतीने स्वत:चा स्वतंत्र ब्लॉक घेतला. आईला कळूही दिले नाही सामान हलवायला ट्रक आला तेव्हा सुधाताईंना प्रमिलाने आम्ही ब्लॉक घेतलाय हे सांगितले.

सुधाताईंच्या डोक्यावर वज्राघातच झाला. त्यांची दातखिळी बसली. आपल्या मुलाने आपणास गाफिल ठेवले. नकळत, न सांगता सगळा व्यवहार केला, आपला विश्वासघात केला असे सुधाताईना वाटले. आई कधीच मुलांच्या सुखाआड येत नसते. पण मुलांनी प्रेम दयावे, विश्वासघात करू नये एवढीच तिची अपेक्षा असते.

अशाप्रकारे श्रीकांतने आईचा विश्वासघात केला होता. **[2]**

(ii) आपले घर, आपला मुलगा, आपली सून या प्रेमाच्या जाळयात आई गुरफटली होती. मुलाचे संगोपन करणे, त्याच्यासाठी खस्ता काढणे, हवे-नको बघणे यातच तिला सुख वाटायचं. हेच तिचे आयुष्य होते.

मुलांच्या पंखात बळ आल्यावर, आईमुळे आपण अस्वतंत्र आहोत असे मुलांना वाटते. प्रमिलाला तिच्या मताप्रमाणे वागायचे होते म्हणून तिने वेगळा ब्लॉक घेतला. आईला त्या दोघांनी कळू दिले नाही. ही गोष्ट आईच्या मनाला फार लागली. त्यांच्या अतीव दु:खातूनच मनाचा कणखरपणा, स्वाभिमान जागृत झाला. पुढचं आयुष्य रडत, भेकत न घालवता एकटा जीव सदाशिव असे स्वच्छंदीपणे घालवायचे. छंद, मैत्रिणी जोपासायच्या. संसारात गुंतून न राहता स्वत:साठी जगायचे. मुलाला दाखवून दयायचे तुला नात्याची, मायेची चाड नाही तर मी सुद्धा एकटी आनंदात राहू शकते.

म्हणून मुद्दाम हिणवून आईने श्रीकांतला म्हटले, ''तुमचे हे उपकार म्हणायचे. तुम्हीच मला सुखाचा मार्ग दाखवून दिलात. नाही तर कसलं रे माझं जीणं ! नुसतं खर्ची पडत राहायचं. कुणाला किंमत ना गरज.'' **[2]**

(iii) आपले घर, आपला मुलगा, आपली सून या प्रेमाच्या जाळयात आई गुरफटली होती. मुलाचे संगोपन करणे, त्याच्यासाठी खस्ता काढणे, हवे-नको बघणे यातच तिला सुख वाटायचं. हेच तिचे आयुष्य होते.

जेव्हा 'आपलं घर' अशी मनात भावना असते तेव्हा घरातील माणसे एकमेकांशी प्रेमाच्या धाग्यांने बांधलेली असतात. आई ही या सर्वांना जोडणारा दुवा असते. आपल्या मुलाचे प्रेमाने पालनपोषण ती करते. आपल्या घरासाठी झटते, त्यातच तिला धन्यता वाटत असते. घरात सून आल्यावर तिचा आनंदाने ती स्विकार करते. पण जेव्हा 'आपली', 'माझी' म्हणणारी माणसे जेव्हा नात्याला तडा पाडतात, नात्यात परकेपणा आणतात तेव्हा जणू पायाखालची जमीन सरकल्यासारखे वाटते. श्रीकांतने आईला न सांगता बायकोच्या म्हणण्याला दुजोरा देऊन वेगळे बिऱ्हाड करायचे ठरवले तेव्हा सामान न्यायला ट्रक येई पर्यंत आईला या ब्लॉक प्रकरणाचा मागमूसही नव्हता.

श्रीकांत वडिलांची खुर्ची नेऊ इच्छित होता. घरातील इतर कोणतेही सामान त्याला नेण्यासाठी नको होते. श्रीकांत स्वत: होमिओपॅथीक डॉक्टर होता. त्याचे वडील सुद्धा होमिओपॅथीक डॉक्टर होते. श्रीकांतच्या बाबांनी याच खुर्चीवर बसून होमिओपॅथीत पैसा, यश मिळवले होते. त्यांचाच व्यवसाय श्रीकांत पुढे चालवत होता. श्रीकांतसाठी ती खुर्ची लकी होती. डॉक्टर म्हणून त्याला यश, पैसा मिळवायचा होता. आणि त्याच्या मते आईला त्या खुर्चीचा काहीच उपयोग नव्हता. म्हणून श्रीकांतने खुर्ची नेण्याचे ठरवले होते. [3]

(iv) चांगल्या नांदत्या घरात प्रमिलाला जणू दुर्बुद्धी आठवली. तिने वेगळा संसार थाटायचे ठरवले. घरात आईला कळू न देता ब्लॉक घेतला. तिला स्वातंत्र्य हवे होते. स्वत:चे निर्णय स्वत:च घ्यायचे होते. तिला तिच्या पद्धतीने जगायचे होते. यासाठी श्रीकांतची इच्छा नसतानाही तिने वेगळे बिऱ्हाड मांडले. आपल्या भावाची मदत घेऊन ब्लॉक घेतला. सामान न्यायला ट्रक आला तेव्हा आईला समजले. सुनेने जणू त्यांच्या डोक्यावर वज्राघातच केला. स्वत:ला खोलीत कोंडून घेत त्या खूप रडल्या.

सुधाताईंचे एकटीचे आयुष्य सुरु झाले. श्रीकांत चार-आठ दिवसांनी यायचा. पण त्या मोजकेच बोलायच्या. सुमालाही त्यांनी कळवले नाही. त्यांच्यामते या लहानसहान गोष्टी का कळवायच्या उगाच उंटावरुन शेळया हाकून आईचे एकटेपण जाणार नव्हते. श्रीकांतला वाटले आई रडेल, भांडेल, टाकून बोलेल. आईच्या या वेगळया प्रतिसादाने तो चकित झाला.

आईने बँकेची कामे करण्यास पण नकार दिला कारण तिच्याकडे आता भरपूर वेळ होता. घरी स्वयंपाक बनवण्याचा प्रश्नच तिने मिटवला होता. त्यांनी श्रीला सांगितले माणसाबरोबर त्यांची हौसमौज बदलते. मैत्रिणी, गप्पा, ट्रिप, भिशी या सगळयात माझा वेळ छान जातो. श्रीकांतने काळजीने औषधे नियमित घ्यायला सांगितले तर कोपऱ्यावरच्या ॲलोपथीच्या डॉक्टर जोशींचे औषध घेते असे त्या म्हणाल्या.

हे ऐकून श्रीला आश्चर्य वाटले. घरात एवढा डॉक्टर असताना तू ॲलोपथीचं औषध का घेतेस? त्याचे साइड इफेक्टस होतात असे काळजीच्या सुरात म्हटले. यावर खंबीरपणे, आपल्या दु:खातून तावून - सलाखून निघालेल्या स्वाभिमानी आईने उत्तर दिले, 'आता तू काही सांगायचा हक्कच गमावला आहेस.' कारण जर खरचं आईची काळजी असती तर तिच्या पाठीत खंजीर खुपसला नसतास, तिचा विश्वासघात केला नसतास. आता उगाच वरवरची चिंता कशाला ? म्हणतात ना, 'आंधळयाच्या गायी देव राखतो.' माझे रक्षण करायला देव पाठीशी आहे आणि मी खंबीरपणे, कणखरपणे जगत आहे. [3]

**A.6** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

**माणसाची गोष्ट**

(i) रस्त्यातून जाताना माणसाच्या डोक्यात अनेक विचारचक्र सुरू असतात. कधी घाईत, कधी चिंतेत तर कधी काही ध्येय मनात ठेवून आपण बाहेर पडतो. त्यावेळी जर कुणी अनोळखी आपल्याला विनाकारण अडवू पाहतो तर आपण चमकून जातो. तसेच माणसाची गोष्ट मधील माणूस घाईघाईने रस्त्याने चाललेला असतो. अचानक कुणी अर्धा हात उंचीच्या गलिच्छ पोराने माणसाची बाही पकडून त्याला अडवले. त्याला पैसा हवा असतो. त्या मुलाला भूक लागलेली असते आणि खाऊला एक पैसा मागण्यासाठी त्या माणसाच्या मागे मागे लागत तो मुलगा जात असतो.

रस्त्याने गडबडीने जाणाऱ्या माणसाला जर अडविले तर त्याला राग येईल. तो घाईत असेल आणि त्याच्याकडे पैशांची मागणी केली तर त्या भिकाऱ्यापासून किंवा हात पसरणाऱ्या मुलापासून आपली सुटका व्हावी म्हणून झटकन पैसे दिले जातील हे लक्षात ठेवून मुलगा रस्त्यावरुन जाणाऱ्या त्या माणसाच्या मागे लागला. [2]

| | | |
|---|---|---|
| (ii) | रस्त्याने गडबडीने जाणाऱ्या माणसाला जर अडविले तर त्याला राग येईल. तो घाईत असेल आणि त्याच्याकडे पैशांची मागणी केली तर त्या भिकाऱ्यापासून किंवा हात पसरणाऱ्या मुलापासून आपली सुटका व्हावी म्हणून झटकन पैसे दिले जातील हे लक्षात ठेवून मुलगा रस्त्यावरुन जाणाऱ्या त्या माणसाच्या मागे लागला. रस्त्याने जाणाऱ्या माणसाला अडवून, त्याच्या कोटाची बाही पकडून तो मुलगा आशाळभूतपणे पाहत असतो. प्रेमळपणे स्मित करुन 'बाबा' अशी एकेरी साद घालून 'एक पैसा' अशी मागणी करतो. तो माणूस बाही सोडवून घेत त्याला हट् करत अव्हेरतो पण पुन्हा पुन्हा बाबा ..... बाबा अशी साद येत असते. पुन्हा माणसाच्या शर्टाचा मागचा पदर खेचून गळ घालण्याच्या सुरात 'खाऊला पैसा' अशी विनवणी मुलगा करतो.<br>आता त्या माणसाला खूप राग येतो. डोळे वटारुन, दात ओठावर रोवून, नाकपुडया फुगवून तो त्या गलिच्छ मुलाकडे बघतो. माणसाला खरेतर पैसा देणे शक्य नव्हते असे नाही पण अशा भीक देण्यामुळे ऐतखाऊ वृत्ती, हात पसरुन, आयते खाण्याची वृत्ती बळावते. सरकारने अशा बेसहारा, निराधार लोकांसाठी अनेक सोयी केलेल्या आहेत. मुलांसाठी शाळा, त्यांच्या पोटासाठी अन्न-खाण्याची सोय सरकार करत असताना, त्या योजनांद्वारे शिकावे, कष्ट करावे ही इच्छा नाही पण येणाऱ्या जाणाऱ्याला त्रास दयायचा, हात पसरुन, इतरांना भंडावून सोडायचे या वृत्तीचा माणसाला तिटकारा होता. ते पोर असा पिच्छा पुरवत राहिले होते. जणू जळू सारखे चिकटू पाहत होते. चार लोकांत तमाशा व्हावा व माणसाला लाजेस्तोवर पैसे दयायला भाग पडावे असा हेतू जाणल्यामुळे माणसाला मुलाचा राग आला. | [2] |
| (iii) | रस्त्याने जाणाऱ्या माणसाला अडवून, त्याच्या कोटाची बाही पकडून तो मुलगा आशाळभूतपणे पाहत असतो. प्रेमळपणे स्मित करुन 'बाबा' अशी एकेरी साद घालून 'एक पैसा' अशी मागणी करतो. तो माणूस बाही सोडवून घेत त्याला हट् करत अव्हेरतो पण पुन्हा पुन्हा बाबा ..... बाबा अशी साद येत असते. पुन्हा माणसाच्या शर्टाचा मागचा पदर खेचून गळ घालण्याच्या सुरात 'खाऊला पैसा' अशी विनवणी मुलगा करतो.<br>माणसाला खूप राग येतो. पैशांची किंमत नाही पण भीक मागण्याची ऐतखाऊ वृत्ती बळावणे हे त्याला मान्य नसते. पण ते पोर विव्हळत, किंचाळत, अगतिक मुद्रा करत मागे मागे धावत असते. तो माणूस मागे वळून पाहतो तेव्हा मुकाटयाने, गरीब मुद्रेने पिच्छा करत ते पोर येते. माणूस सुद्धा 'अरे हट्! असा अर्थ कायम ठेवून शब्द बदलून त्या पोराला अव्हेरतो. उग्र, संतापी चेहरा करुन, हात उगारुन डोळे गरागरा फिरवतो पण ते पोर या सगळयाला बधत नाही, दाद देत नाही. मागे येतच राहते. तेव्हा लोक जास्तच पाहू लागतात. हे पोर या माणसाचे कोण अशी पुच्छा होते. समाजातील घसरत्या नैतिक पातळीचे हे उदाहरण अशा शब्दात कटू, कुत्सिक, शब्द माणसाला ऐकू येतात भूक लागली, पैसा हवा, खाऊला एक पैसा हवा अशी वस्तुस्थिती सांगत, पोटावर फडाफडा हात मारुन घेत ते फाटक्या, मळक्या कपडयातलं - शेंबडं लेंबडं - मळकट कळकट पण व्रात्य पोर, लूत भरलेल्या कुत्र्यासहित माणसाच्या मागे येत राहतं. हे काय प्रकरण आहे हे बघायला लोकांची गर्दी माणसाच्या सभोवताली जमते. | [3] |
| (iv) | आपले नियोजित काम ध्यानात ठेवून माणूस घाईघाईने रस्त्याने जात असतो. अचानक एक गलिच्छ. फाटक्या - मळक्या कपडयातलं-शेंबडं लेंबडं - मळकट कळकट - मेणचटलेले आणि व्रात्य पोर 'बाबा' अशी एकेरी हाक मारत खाऊला पैसा दया अशी विनवणी करतो.<br>पोराचे 'बाबा' अशी आर्त हाक मारणे, पदर धरणे, रडणे, विव्हळणे रस्त्यातील लोक पाहत असतात. त्यांची गर्दी जमते. अनेक लोक, अनेक विचार, अनेक मते निघतात. समाजातील घसरलेल्या नैतिकतेविषयी चर्चा होते. अंधारात भानगडी करायच्या आणि उजेडात आल्यावर त्याला नाकारायचे. पाप पचत नाही. हे कुत्रं त्या पोराचं आणि ते पोर कुणाचं ? तर त्या माणसाचंच आहे असा आरोप केला जातो. गर्दीची चर्चा रंगते. याचा फायदा त्या भीक मागणाऱ्या पोराचा होतो. ते अधिकच चेंगटपणे 'पैसा' मागत विव्हळते. शेवटी ते पोर त्या माणसाचे अनौरस पोर असले पाहिजे असा संभव, संशय व ठाम विश्वास सर्वत्र व्यक्त होतो. | |

अति झाल्यावर, काहीही कारण नसताना नसते बालंट अंगावर येते आहे ते पाहून माणूस वैतागतो आणि निर्विकार चेहऱ्याने, विरक्तपणे उभा राहतो. शेवटी ''मी याचा कोणी नव्हे !'' असे गर्दीला निक्षून सांगतो. पण लोकांची पक्की खात्री होते की त्या गलिच्छ पोराचा तो माणूसच संभावित बाप आहे.

तेवढयात त्या माणसाला ओळखणारा एक इसम त्या गर्दीत घुसतो आणि तेथे त्या माणसाला पाहतो. चौकशी अंती त्याला संकटमुक्त करुन त्या पोराला पिटाळतो. ''इतक्या सच्छील माणसावर आणि असला अनैतिक पितृत्वाचा गलिच्छ आरोप कसा करता ?'' असा प्रश्न करतो. गर्दीला अशाप्रकारे तो पिटाळून लावतो. कारण तो ओळखीचा इसम त्या माणसाला सच्छील मानत असतो. प्रत्येकवेळी गर्दी काय म्हणते, वरवरचे आरोप करते ते खरे असतीलच असे नाही. संकटकाळात मदत केली पाहिजे असे त्याचे मन मानत असावे. त्याची सद्विवेक बुद्धी जागृत झाली असावी आणि शेवटी गर्दीचे आरोप व त्या व्रात्य मुलापासून त्या माणसाला वाचवतो. **[3]**

**A.7** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**वेग**

(i) घरची आर्थिक परिस्थिती, शिक्षणाविषयी उदासिनता, झटपट पैसा कमवण्याची धडपड या गोष्टीने माणूस शिक्षणापासून दूर होत जातो. जगमोहनचे वडील अचानक हृदयविकाराचा झटका येऊन तरुण वयातच वारले होते. आई आणि जगमोहन खेतवाडीत रहायचे. प्रॉव्हिडंट फंडाचे व्याज आणि आईची पार्टटाइम नोकरी यातून दोघांचे कसेतरी भागे. वेळप्रसंगी काकांची मदत घेऊन संसाराची गाडी पुढे ढकलावी लागे. जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. नावाला कॉलेजमध्ये जात होता त्यामुळे परीक्षेत पास होईल अशी खात्री नव्हती. घरच्या परिस्थितीमुळे, पैशांची ओढाताण बघून साहजिकच त्याला लवकर पैसे कमवावे व परिस्थिती बदलावी असे त्याला वाटत असावे.

शेवटी शिकायचे ते कशासाठी ? नोकरी करण्यासाठी, पैसा कमावण्यासाठीच ना ? मग शिक्षणात आवड नसताना, पास होण्याची खात्री नसताना उगाच चार वर्षे फुकट का घालवावी ? काका जरी प्रेमाने करत असले तरीही त्यांच्या जीवावर किती रहावे ? त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली. **[2]**

(ii) जगमोहनचा काका लेखकाचा जवळचा मित्र होता. जगमोहनला वडील नव्हते. घरची परिस्थिती बेताचीच. त्यामुळे अडीअडचणीला काकाच त्यांच्या मागे उभा राही. कधीतरी काकाचा निरोप घेऊन जगमोहन लेखककाडे आला, कधी रस्त्यात जाता येता भेटला, बोलाचाली झाली असा त्यांचा घरोबा वाढत गेला. जगमोहन स्वभावाने बोलका, महत्त्वाकांक्षी व सतत प्रगतीच्या आणि दुप्पट वेगाने पुढे जाणारा होता. एका जागी स्थिरावणे त्याला ठाऊक नव्हते. झटपट श्रीमंत होण्याचे ध्येयच जणू तो पूर्णत्वास आणत होता.

वरुण हा जगमोहनचा अवघा चौदा वर्षांचा मुलगा. वडिलांचेच हाडपेर घेऊन जन्माला आला आणि त्यांच्याही पेक्षा अधिक वेगाने जगणारा होता. किंबहूना वेगाची नशाच झाली होती त्याला. जे वडिलांच्या कडून पाहून शिकला त्याच्याही पुढचे पाऊल म्हणजे वरुण होता. 'बापसे बेटा सवाई' असे म्हणणेच योग्य होते. गाडी चालवण्याचे लायसन्स नसतानाही वडिलांचा डोळा चुकवून सुसाट गाडी पळवत असे.

खेळण्यांच्या प्रदर्शनात लेखक जगमोहनकडे गेले होते. तेथे वरुण आला. वडिलांची रीतसर परवानगी घेऊन गाडी मागण्यासाठी. नो स्पीडिंग अशी कौतुकाने ताकीद देऊन जगमोहनने परवानगी दिली. पोलिसांना पकडता येऊ नये म्हणून मी गाडी वेगाने चालवतो अशी सबब सांगून वरुण तेथून सटकला.

| | | |
|---|---|---|
| | वेगाचे फार वेड असलेल्या वरुणने रात्री दोनच्या सुमारास मरीन ड्राइव्हवर प्रचंड वेगाने मारूती चालवत असताना थांबलेल्या ट्रकवर जाऊन आदळली आणि जागच्या जागी ठार झाला. ती बातमी लेखकाला संध्याकाळी दूरदर्शनवरील बातम्यांमध्ये ऐकायला मिळाली आणि लेखक लगोलग जगमोहनच्या अंधेरीच्या नवीन बंगल्यावर भेटायला गेले. लेखक पोहोचे पर्यंत सारे काही आटोपले होते. लोक घरोघरी परतले होते. बंगल्यामध्ये अंगावर काटा आणणारी शांतता होती. हॉलमध्ये वरुणच्या छायाचित्राची मोठी तसबीर होती. त्यावर हार चढवले होते. समोर दिवा जळत होता. | [2] |
| (iii) | जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. नावाला कॉलेजमध्ये जात होता त्यामुळे परीक्षेत पास होईल अशी खात्री नव्हती. घरच्या परिस्थितीमुळे, पैशांची ओढाताण बघून साहजिकच त्याला लवकर पैसे कमवावे व परिस्थिती बदलावी असे त्याला वाटत असावे.<br>त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली.<br>लेखकाने त्याला ग्रॅज्युएट होण्याबद्दल सांगितल्यावर तो म्हणाला, शेवटी नोकरी ही करायचीच ना? मग चार वर्षे फुकट घालवायची, काकांचे पैसे घालवायचे त्यापेक्षा पैसे कमावणे हे चांगले.<br>पुढे वर्षभराने जगमोहन पुन्हा लेखकाला रस्त्यात भेटला. त्यावेळी तो स्कुटरवर होता. त्यांना पाहताच स्कुटर थांबवून म्हणाला, जरी सेकंडहँड स्कुटर असली तरी स्पीड चांगला आहे. येण्याजाण्यासाठी काहीतरी वाहन हवेच. उगाच बसच्या रांगेत कोण ताटकळत थांबणार ? म्हणजे बससाठी उभे राहून वेळ घालविण्यासारखेच आहे.<br>या वर्षभरात जगमोहनमध्ये बराच फरक जाणवत होता. साहजिकच आहे. स्वत: कमवायला लागला होता. हाती बऱ्यापैकी पैसा येत असावा. घरात फक्त आई आणि व्याजाच्या पैशांवर अवलंबून रहावे न लागता परिस्थिती बदलली होती. पूर्वीचा साधेसे कपडे घालून वावरणारा जगमोहन आता एकदम मोठा पुरुष वाटत होता. अंगात जीन्स-जॅकेट घालून, मिशा ठेवून आधुनिक वाटत होता लेखकानी त्याचे एकदा टाय शॉप बघायला येईन असे सांगताच तो म्हणाला, ''आणखी थोड्या दिवसांनी या मग तुम्हाला खरच माझं टॉय शॉप बघायला मिळेल!''<br>याचाच अर्थ जगमोहन घरात हातभार लावण्यासाठी पैसे कमावणे, तुटपुंज्या पगारावर समाधान मानणे, इतरांची चाकरी करण्यात समाधान मानणारा नव्हता. एकच वर्ष नोकरी करुन सर्व सिस्टीम जाणून घेऊन कर्ज काढून स्वत:चे टॉय शॉप उभारणारा, गतीने जीवनात पुढे जाणाऱ्या जगमोहनकडे पाहताच लेखक बुचकळ्यात पडले. | [3] |
| (iv) | जगमोहन तसा कॉलेजच्या दुसऱ्या वर्षाला होता. पण शिक्षणात तसा त्याला रस नव्हता. त्याच बरोबर चालून आलेली नोकरीची संधी सोडून देणे त्याला योग्य वाटले नाही. म्हणून जगमोहनने कॉलेज सोडण्याचा विचार केला आणि टॉय शॉपमध्ये सेल्समन म्हणून नोकरी धरली. या वर्षभरात जगमोहनमध्ये बराच फरक जाणवत होता. साहजिकच आहे. स्वत: कमवायला लागला होता. हाती बऱ्यापैकी पैसा येत असावा. लेखकानी त्याला एकदा टाय शॉप बघायला येईन असे सांगताच तो म्हणाला, ''आणखी थोड्या दिवसांनी या मग तुम्हाला खरच माझं टॉय शॉप बघायला मिळेल!'' एकच वर्ष नोकरी करुन सर्व सिस्टीम जाणून घेऊन कर्ज काढून स्वत:चे टॉय शॉप उभारणारा, गतीने जीवनात पुढे जाणाऱ्या जगमोहनकडे पाहताच लेखक बुचकळ्यात पडले.<br>आणखी दोन महिन्यांनी जगमोहनकडून 'जेम टॉईज्' च्या उद्घाटनाचे लेखकाला कार्ड आले. दुकानात शोविन्डोज, आरसे, दुकानाच्या नावाची उंच पाटी, फुटपाथवर फुलझाडे असे मांडून जगमोहनने दुकान छान सजवले होते. शेजारी एक खेळण्याचे दुकान होते, त्या दुकानाची जगमोहनला स्पर्धा वाटत नसून फायदाच वाटे. त्याच्या दुकानात अधिक फिनिश, जास्त वेग असणाऱ्या इंपोर्टेड कार्स, जीप्स आणि मोटर सायकली ठेवल्या होत्या. | |

गाड्या मॅन्युफॅक्चर करणाऱ्या स्वाडिश कंपनीचा अधिकारी आधीचे त्याचे टॉय शॉप बघायला आला होता. त्याला जगमोहनने आपली थिअरी, पुढे जाण्याची जिद्द, आत्मविश्वास सांगितला. प्रत्येक लहान मुलाला मोठे व्हायची घाई असते. त्याला फास्ट कार्स आवडतात! एका जागी उभी राहणारी खेळणी त्याला नको असतात. हे जगमोहनचे मुलांविषयी निरीक्षण ऐकून प्रचंड प्रभावित (इम्प्रेस) झाला. तिथून कॅटलॉग पाठवून त्याच्या प्रॉडक्टस् संबंधी त्यांचा पत्रव्यवहार सुरू झाला. स्वतः कडचे सगळे पैसे ओतून त्याने शेजारचे दुकान विकत घेऊन मूळ दुकानाला जोडले. 'जेम्स टॉईज्' प्रशस्त, एअरकंडिशन बनवले.

जगमोहनला साचेबंदपणा, एका जागी फार काळ स्थिरावून राहणेच- पसंत नव्हते. सतत गती, पुढे पळणे, श्रीमंत - अति श्रीमंत व्हायचे होते; तेही जलद गतीने - थोडक्या काळात ! म्हणूनच स्वतःशीच नकळत जीवघेणी स्पर्धा करत होता तो. **[3]**

## काव्यांगण

**A.8** Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

(अ) खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**संतवाणी (नको देवराया)**

(i) मंगळवेढयातील श्यामा नावाच्या नर्तिकेची कान्होपात्रा ही मुलगी. दिसायला अतिशय सुंदर, रुपगुणाने सर्वसंपन्न तिच्या सौंदर्याची कीर्ती बेदरच्या बादशहापर्यंत पोचली. तिला आपल्या दरबारात हजर होण्यासाठी बादशहाने बोलावणे धाडले.

कान्होपात्रेचा जन्म एका गणिकेच्या पोटी झालेला असला तरी ती वृत्तीने विरक्त होती. विठ्ठल भक्तीत सदैव मग्न असे. आपले तनमन तिने विठठल चरणी अर्पण केले होते. विठ्ठल भक्ती शिवाय तिला इतर काहीं सुचत नसे. असे तिचे मन विठ्ठलाशी तादात्म्य पावले होते.

कान्होपात्रेने बादशहाच्या बोलावण्याला नकार दिला. बादशहाने आपला अपमानाबददल चिडून कान्होपात्रेला तिच्या घरातून उचलून आपणाचे फर्मान सोडले व सैनिकांना धाडले.

आपली विटंबना होऊ नये, आपले रक्षण करावे व या संकटातून आपली सुटका करण्यासाठी आपली आई, विठाबाईला अर्थात 'विठ्ठलाला' काकुळतेने आर्त साद घातली.

निस्सीम भक्तिभाव व करूणार्ततेने 'नको देवराया अंत पाहू आता' अशी साद घातली. **[2]**

(ii) मंगळवेढयातील श्यामा नावाच्या नर्तिकेच्या पोटी रूपगुणांची खाण जन्माला आली. अशी सर्वगुण संपन्न कान्होपात्रा विठ्ठलभक्तीत तल्लिन झालेली होती. 'खाण तशी माती' असे जरी म्हणत असले तरी कान्होपात्रात आईचे गुण नव्हते. तिने आपले मन तन विठ्ठलचरणी अर्पण केलेले होते. तिच्या सौंदर्याची वाखाणणी सगळीकडे होत असताना बेदरचा बादशहा तिच्या कीर्तीवर आकर्षित झाला. तिला आपल्या दरबारात येण्याचे बोलावणे धाडले. कान्होपात्रेने नकार देताच तिला उचलून जबरदस्तीने दरबारात हजर करण्यास सैनिक पाठवले.

जिवाची तगमग आणि असहाय्यता या वेदनेतून स्वतःचे रक्षण करण्यासाठी आपले आराध्य दैवत, आपल्या विठाईमाऊलीचा ती धावा करते.

कान्होपात्रा म्हणते, माझ्यावर संकट आले आहे. अगदी गळयापर्यंत आले आहे. हे देवराया, तू माझा अंत पाहू नको. माझे प्राण कंठाशी आले आहेत. हरिणीचे असहाय्य, गोजिरवाणे पाडस जर वाघाच्या तावडीत सापडले तर त्याच्या जीवाची जी तडफड होईल, सुटकेसाठी ते जसे जिवाचा आकांत करेल तशी माझी ही अवस्था झाली आहे.

या संकटातून माझी सुटका तुझ्याविना कोणी करणारा या तिन्ही लोकात नाही. माझी असहय तडफड, तळमळ हे देवा तुला दिसत नाही का ? हे जननी विठाबाई, धावत ये आणि आपल्या मुलीस आपल्या कृपाछत्राच्या

सावलीत घे. तुला यायला उशीर होत आहे तशी माझ्या मनातील आशा संपून मन दु:खाच्या गर्तेत जणू कोलांटया मारत खोल जात आहे. आजूबाजूला स्वार्थी जगाचा बाजार भरलेला आहे. यात माझी व्यथा कोण जाणणार ? हे देवा, माझी विटंबना थांबव. या जगातून माझी सुटका कर व मला तुझ्या चरणाशी स्थान दे, हे विठाई माऊली, या कान्होपात्रेस तुझ्या हृदयात बंद करुन ठेव.

अशा प्रकारे स्वार्थी जगातून सहिसलामत सुटका फक्त विठ्ठलच करू शकेल असा दृढ विश्वास मनात कायम ठेवून कान्होपात्रा आर्ततेने तिच्या आराध्य दैवतास साद घालते. [3]

Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

(ब) खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**संतवाणी (कांदा मुळा भाजी)**

(i) आपले रोजचे जीवन जगत, नित्यकर्म करीत असताना त्यातूनच परमेश्वराला शोधणाऱ्या संत सावता माळी यांच्या 'कांदा मुळा भाजी' या अभंगातून आगळ्या वेगळ्या भक्तीचे दर्शन घडते.

आपले कर्तव्य, आपला व्यवसाय आणि परमेश्वर या दोन्ही गोष्टी अभिन्न आहेत. नित्यकर्मातच परमेश्वराचे रूप पाहणारे संत सावता माळी आहेत. आपल्या मळ्यातच पंढरी पाहून ते विठ्ठलाचे नामस्मरण करतात. पंढरपूरला जाऊन विठाई माऊलीचे दर्शन घेणे त्यांना शक्य नसले तरी आपल्या भक्तीच्या जोरावर पंढरीलाच आपल्या मळ्यात आणले. त्यात लावलेल्या कांदा, मुळा अशा भाज्याच जणू विठाई माऊली आहे असा ते एकरुपतेचा अनुभव घेतात. मनाला धन्य धन्यता वाटते.

अशा प्रकारे जळी, स्थळी परमेश्वराचे अस्तित्व पाहणारे व विठ्ठलाच्या पायी आपला जीव गुंतवणाऱ्या सावता माळ्यांना मळ्यातील भाजीतून विठ्ठलाचे दर्शन होते. [2]

(ii) इतर भक्तांहून संत सावता माळ्यांची भक्ती वेगळी आहे. माळ्याचा व्यवसाय करत असले तरी त्यांच्या भक्तीचा मळा विठ्ठल भक्तीने फुललेला आहे. या भक्तीचा अनुभव आपल्याला 'कांदा मुळा भाजी' या संत सावता माळी यांच्या अभंगातून येतो.

पंढरपूरला असलेले विठ्ठलाचे रूप तर सर्वपरिचित आहे. पण आपल्या मळ्यालाच पंढरी मानून त्यात उगवणाऱ्या / पिकणाऱ्या कांदा, मुळा, लसूण, कोथिंबीर यासारख्या भाजीपाल्याच्या रूपात सावता माळ्यांना पांडुरंग दिसतो. असे आपल्या कामातच परमेश्वराचे रूप फक्त त्यांनाच दिसले. माळावर कष्टाचे काम तासनतास करताना मन मात्र ईश्वरचरणी लागलेले असे. तोंडातून अखंड नामस्मरण, नेत्रांना जळी, स्थळी ईश्वराचे अस्तित्व दिसे.

माणसाने आपले कर्तव्य कर्म अगदी प्रामाणिकपणे करावे पण ते करताना मात्र भावभक्तीने देवाचे नाम घ्यावे असा सहज सोपा भक्तीमार्ग त्यांनी सर्वांपुढे ठेवला. हा समर्पणाचा भाव, विनम्रता हे संत सावता माळी यांच्या भक्तीचे वेगळेपण आहे. [3]

**A.9** Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**'पैठणी'**

(i) लग्नानंतर पत्नी ही पतीची अर्धांगिणी असते. पतीला परमेश्वर मानून ती संसाराचा गाडा हसतमुखे चालवते आणि आयुष्य संपताना सुद्धा जर ती सौभाग्यवतीच देवाघरी गेली तर ते अधिक भाग्याचे समजले जाते. अशी ही या नातीची आजी संसार करता करता अहेवपणीच देवाघरी गेली. ती भाग्यवान होती की जिला पतीनंतरचे एकटेपणाचे आयुष्य जगावे लागले नाही म्हणून तिचे सोने झाले. तिचे जीवन सार्थकी लागले. [2]

| | | |
|---|---|---|
| (ii) | आजी लग्नाच्या पवित्र बंधनात, त्या मंगल कार्याला पैठणी नेसली होती. थोरामोठ्यांचे आशिर्वाद घेण्यासाठी पदर हाती धरुन, वाकून सगळ्यांच्या पाया पडली होती. अनेक वर्षे आजीने सुखाने, समाधानाने, मोठ्या कुशलतेने संसार केला. नव्याचे नवेपण गेले. लाजरा-बुजरा अबोल स्वभाव जाऊन आजी संसारात रुळली. नवे कापड, नवी साडी जशी सुरुवातीला कडक असते. त्या साडीला खळ असल्याने कडक पोत असतो पण नंतर वापरुन ती मऊसूत बनते. नरम बनते. तसेच आयुष्यातील अनेक चढउताराने माणसाच्या स्वभावात बदल होतो. स्वभावात मायाळूपणा आला. पैठणीच्या घडीघडीतून आजी संपूर्ण आयुष्याचा चलतचित्रपट जणू नातीच्या डोळ्यांपुढे सरकत गेला. तिला आजीचे आयुष्य उमगू लागले. ती आजीला अधिक जाणायला, समजायला लागली. लग्नानंतर पत्नी ही पतीची अर्धांगिनी असते. पतीला परमेश्वर मानून ती संसाराचा गाडा हसतमुखे चालवते आणि आयुष्य संपताना सुद्धा जर ती सौभाग्यवतीच देवाघरी गेली तर ते अधिक भाग्याचे समजले जाते. अशी ही या नातीची आजी संसार करता करता अहेवपणीच देवाघरी गेली. ती भाग्यवान होती की जिला पतीनंतरचे एकटेपणाचे आयुष्य जगावे लागले नाही म्हणून तिचे सोने झाले. तिचे जीवन सार्थकी लागले. | [2] |
| (iii) | आज आजी या जगात नाही. शरीराने या घरात नाही पण अनेक आठवणींच्या रुपाने तिच्या हाताळलेल्या अनेक वस्तूंच्या, कपड्यांच्या रुपाने जणू ती आजही आहे. कपाटात सगळ्यात खाली तळाच्या खणात एक बोचके बांधलेले आहे. त्या बोचक्यात अनेक जुन्या गोष्टी बांधून ठेवल्या आहेत. त्या गाठोड्यात जुने कपडे, कुंच्या, टोपडी, शेला, शाली अशा अनेक गोष्टी आहेत. त्या कपड्यांबरोबरच आजीने अगदी जपून ठेवलेली तिच्या लग्नातली पैठणी त्यात आहे. पैठणी ही रेशमी, भरजरी अशी खास साडी असते. जी आजी तिच्या लग्नात नेसली होती. तिचा पदर भरजरी व नारळी पदर होता. जरी काठी व चौकडीची व सुंदर हिरवा रंग असलेली ही आजीची पैठणी तिने जपून ठेवलेली आहे.<br>आजीचे आणि नातीचे हे नातेच इतके प्रेमाचे आणि हळूवार आहे की आजीच्या पैठणीला स्पर्श केल्याबरोबर तिच्या डोळ्यांसमोर आजीच्या आयुष्याचा चित्रपट झळकू लागला. लहान वय, सुंदर रुप, रेखीव आणि भरजरी पैठणी या सगळ्यांचा संगम म्हणजे देखणी आजी ! ही आजी लग्नाच्या पवित्र बंधनात, त्या मंगल कार्याला पैठणी नेसली होती. थोरामोठ्यांचे आशीर्वाद घेण्यासाठी पदर हाती धरुन, वाकून सगळ्यांच्या पाया पडली होती. होम, हवनाचा दरवळणारा सूक्ष्म वास, ओळखीचे, अनोळखी पाहुण्यांचे निरीक्षण, नव्या नवरीविषयी असलेली त्यांची मते, आशा अपेक्षा या सगळ्यांविषयी गूढ जाणीव त्या पैठणीला आहे. या सर्व गोष्टींची साक्षीदार ती पैठणी आहे.<br>श्रावणात प्रत्येक दिवसाचे काही ना काही महत्त्व असते. पूजेच्या वेळी धूप, कापूर, उदबत्यांचा दरवळणारा गंध; त्यामुळे सारे वातावरण मंगलमय, पवित्र बनते. हळदीकुंकवाला खस-हिन्याची अत्तरे लावले असेल. सगळीकडे त्या अत्तराचा मंद सुगंध पसरला असेल आणि तिच अत्तराची बोटे नकळत पुसली गेली असतील. आजीने आपल्या लांबसड़क केसांचा आंबाडा घालून शेवंती, चमेलीचे गजरे किंवा वेणी घातली असेल. तो अत्तराचा गंध, फुलांचा सुवास सारे काही त्या पैठणीने टिपून घेतले असावे. आजी भाग्यवान होती त्यामुळे अहेवपणीच तिला मरण आले. तिच्या आयुष्याचे सोने झाले आज नातीला हे सारे पैठणीची घडी उलगडून बघताना जाणवते. तो सुक्ष्म, मंद सुवास तिला आजीचे जीवन उलगडून दाखवतो. | [3] |
| (iv) | या जगात आईसारखे प्रेम करणारे दुसरे कोणी नसते असे म्हणतात. पण आई सारखेच प्रेम करणारी दुसरी व्यक्ती म्हणजे आजी असते. वयाची परिपक्वता आलेली, अनुभवसंपन्न असलेली आणि मनात प्रेमाचा सागर असलेली आजी, आपल्या नातवंडांवर अथांग प्रेम करत असते.<br>या नातीला आजीचा सहवास लाभला आहे. आजीचे प्रेम, माया या नातीने अनुभवले आहे. आज आजीची कमतरता तिच्या मनाला दु:खी करते. आजीची प्रकर्षाने जेव्हा आठवण येते, मन व्याकुळ होते तेव्हा ही नात आजीची पैठणी काढून उराशी कवटाळून धरते. जणू ती त्या पैठणीतून आजीचा प्रेमळ स्पर्श शोधते. तिच्या सा- | |

या वस्तूतून आजीचा स्पर्श अनुभवते. मनाला होणा-या दु:खाला ती पैठणीच्या स्पर्शाने कुरवाळते. त्या पैठणीच्या मऊ रेशमी स्पर्शामध्ये नातीला तिची आजी भेटते. जणू आत्ता ही पैठणी नेसूनच नातीला जणू कुशीत घेऊन मायेने तिच्या डोक्यावरुन, पाठीवरुन हात फिरवते आहे. लाडाने तिचा मुका घेत आहे. आजीची स्नेहार्द्र नजर नातीवर फिरते आहे असे तिला वाटते. या स्पर्शाच्या जादुमयी दुनियेत वावरताना मग आजीच्या विरहाची मधली वर्षे नकळतच गळून पडतात. मागचा भूतकाळ आणि आत्ताचा क्षण यांचा जणू धागा जुळतो. तो क्षण सजीव, जिवंत झाल्यासारखा होतो. जणू आजी प्रत्यक्ष आत्ता माझ्याजवळ आहेच असा त्या नातीला भास होतो. मग आजीच्या आठवणीने डोळे पाण्याने डबडबतात, ह्रदयात भावनांचा उद्रेक होतो आणि नात आपल्या आजीला मी खूप मजेत आहे, खूशीत आहे. तुझ्याच संस्कारांच्या वाटेने, तुझ्याच आशीर्वादाच्या बळावर आनंदाने जीवन जगत आहे. असा निरोप देण्यासाठी पैठणीच्या चौकड्यांना विनंती करते, की तुम्ही माझ्या आजीला माझे कुशल सांगा. **[3]**

**A.10** Read the stanza given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील पद्यांश वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**प्रेमाचा गुलकंद**

(i) गुलाब हे प्रेमाचे प्रतीक आहे. लाल गुलाब तर काय ? जणू धडधडते ह्रदयच. लाल गुलाब म्हणजे प्रेमाने भरलेले ह्रदयच जणू ! अशी ही लाल गुलाबाची फुले बाजारातून कुठून तरी त्या तरुणाने रोज आणून नियमाने तिला म्हणजे त्या तरुणीला देण्याचा जणू नियमच केला. अगदी न चुकता ती गुलाब पुष्पे आणून तो आपल्या प्रेमदेवतला मुकपणे देत असे.

मौनात, मुग्धपणातच तिचा होकार दडलेला आहे, मौनात खोलवर प्रितच दडलेली आहे. लाजेमुळे प्रितीचे शब्द तिच्या ओठांवर येत नसावेत. तिचे मौन म्हणजे होकार आहे असे त्यास वाटत होते. मग त्याने सुद्धा तिच्यासारखेच अबोल राहण्याचे ठरविले. आपणही आपल्या मनातले प्रेम का बरे व्यक्त करावे. या भावना मनात आहेत हेच बरे. **[2]**

(ii) प्रेमाचे नजराणे देऊन आपल्या प्रेमदेवतेकडे मौनातून प्रेम व्यक्त करत होता. तिचे मौन, मुग्धपणा यात प्रेम दडलेले आहे असे वाटण्यात पुरेपूर सात महिने लोटले पण कधीही या प्रेमाच्या नाजुक रतिबात, त्या प्रेमवेडया वीराकडून खंड पडला नाही. आपल्या प्रेयसीची तो अशी तपश्चर्या करतच राहिला. वाट बघत राहिला.

त्याच्या धैर्याचा बांध अखेर ढळला. जणू तो कोलमडून पडला. त्याच्या प्रेमतपश्चर्येला जणू तडा जाऊ लागला कारण तिच्या प्रेमाची कळी खुलण्याचा काही रंग दिसेना. तिच्या शांत चर्येवर प्रेमाचा रंग कही चढत नव्हता. त्याला प्रतिसाद मिळण्याचे लक्षण दिसेना. **[2]**

(iii) लाल गुलाबाच्या गुलकंदाच्या औषधावर बिचारा, दिवाणा प्रेमवीर तिची आठवण काढत कसातरी जगला. जर हे प्रेमाचे औषध म्हणजे गुलकंद जर नसते तर तो बिचारा प्रेमरोगी कधीच 'खपला' असता, मेला असता.

स्वत:च्या वेडेपणावर हसावे की रडावे ? काळ हे नेहमी सर्व दु:खावर औषध असते. काळानुरुप त्याचे दु:ख थोडे कमी झाले असेल. आता तोच वेडा प्रेमवीर, प्रेमवेडया तरुणांना सल्ला देतो की, जर तुमचा प्रेमभंग झाला असेल, प्रेमांत निराशा आली असेल तर हा प्रेमाचा गुलकंद चाटुनी बघा. मनाला, ह्रदयाला याने शांती मिळते. ह्रदयाचे घाव भरुन निघतात.

असा हा स्वप्नाळू वृत्तीचा तरुण स्वत:च्याच स्वप्न जाळयात अडकतो आणि तोंडघशी पडतो. त्याच्या प्रेमव्यवहारातील हास्यास्पदता वाचता वाचता हसू तर फुटतेच पण कणव ही येते. तरुण-तरुणींनो, प्रेमाची स्वप्नं जागेपणी पहा. उगाच स्वप्नाळू राहू नका. सत्याची साथ दया आणि जीवनात पुढे चला. **[3]**

| | | |
|---|---|---|
| (iv) | अति झाले आणि हिम्मत करुन आपले हृदय मनातले भाव उघडे करुन तिच्यासमोर ठेवायचेअसे ठरवून तो प्रियकर आपल्या प्रिये समोर गेला. प्रियकर म्हणाला, हे प्रिये, मी तुला माझी प्रेमदेवता मानून तुझी मी आजवर पूजा बांधित आलो.<br>मी आजवर फुललेले, ताजे, टवटवीत असे गंद तुला अर्पण करत आलो ते उगाच होते का ? तुही ते अगदी मुग्धपणाने स्विकारत आलीस, माझा कधीही अपमान केला नाहीस की ती भेट नाकारली नाहीस. मग असे असताना मी काय समजू ? हे सुंदरी, माझी प्रेमतपश्चर्या सगळी फुकट गेली का ? अर्पण केलेले ते गुलाब व्यर्थ गेले का ? त्याच्या मनाची अशी व्याकुळ अवस्था झाली.<br>त्या तरुणाच्या प्रेमाशी अनभिज्ञ असलेली ती तरुणी जिच्या मनात फक्त फुले स्विकारण्या पलिकडे कसलाच भाव नसल्याने त्याला ओरडून म्हणाली, माझ्यावर उगाचच खोटा आळ घेऊ नका. तुम्ही दिलेल्या फुलांची मी एक पाकळी सुद्धा वाया घालविली नाही. तुम्ही दिलेल्या भेटीची, नजराण्याची मला जाण आहे.<br>असे ओरडून बोलून ती त्याच पावली आत निघून गेली. क्षणभरातच आतून कसलीतरी काचेची बरणी घेऊन आली. त्या तरुणाला म्हणली, बघा तुम्ही दिलेले गेंद मी वाया न घालवता या बरणीत टाकले. आणि तुमच्यासाठी इतका गुलकंद बनवला. तुम्ही दिलेल्या नजराण्याची किंमत नाही, वाया गेले असे कसे म्हणता ? त्या फुलांचे महत्त्व लक्षात घेऊन मी एकही पाकळी वाया घालविली नाही. | [3] |
| | **रंगस्पर्श** | |
| **A.11** | Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :<br>खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.<br>**सकाळचा अभ्यास'** | |
| (i) | दिनू व दामू सकाळच्या वेळी अभ्यास करीत बसले होते. दोघेही जोरजोरात पाठांतर करीत होते. त्यातून दोघांनाही त्रास होत होता. मात्र कोणीही आपला आवाज कमी करायला तयार नव्हते. दिनूच्या मोठमोठ्याच्या ओरडण्याला कंटाळून दामूने त्याला आवाज हळू करायला सांगितले, नाहीतर श्रीमुखात मारीन अशी धमकी दिली. त्यावर दिनूने त्याची आईजवळ तक्रार केली. तेव्हा दामूनेही आपली सफाई दिली. दामूच्या धमकावणीला न घाबरता दिनूने मोठ्याने घोकंपट्टी चालूच ठेवली. वैतागलेला दामू त्याला मारायला गेला पण दिनू घाबरून घरात पळाला. मात्र या गडबडीत दामूचा पाय पडून त्याची पेन्सिल तुटली. त्याला या गोष्टीचे वाईट वाटले. पण त्या दोन तुकड्यांकडे पाहून 'बरं झालं, एक तुकडा हरवला तर दुसरा आहेच. शिवाय आज पाटीवर शुद्धलेखन काढायचे नाही' अशी आपल्याच मनाची समजूत घालून घेतली व तो पुन्हा पाठांतराला बसला.<br>अशाप्रकारे पेन्सिल तुटल्यावरही दामूने सकारात्मक विचार करून आपल्या मनाची समजूत काढली. | [2] |
| (ii) | दामू व दिनू हे दोन भाऊ अभ्यास करत होते. दामू इंग्रजीचे शब्द पाठ करत होता व दिनू खानदेशातील तालुके पाठ करत होता. दोघांच्याही जोरजोरात घोकण्यामुळे भांडण सुरू झाले व अभ्यास बाजूलाच राहिला. काहीवेळाने दोघेही चहा प्यायला आत गेले. तेवढ्यात त्यांचा छोटा भाऊ जगू तेथे आला. जगू दामूच्या रीडरमधील चित्रे आपल्या मित्राला दाखवायची म्हणून रीडर घेऊन गेला. चहा पिऊन आलेल्या दामूला खूप शोधूनही आपले रीडर सापडले नाही, त्यामुळे त्याचे शब्दांचे पाठांतर अडून राहिले. टाईमटेबल रीडरमध्ये होते, त्यामुळे दुसऱ्या दिवशी कोणते तास आहेत हे त्याला समजेना. घरचा अभ्यास काय आहे हे विचारण्यासाठी गणूकडे जावे लागल्यामुळे त्याचा अभ्यासाचा वेळ वाया गेला.<br>अशाप्रकारे दामूचे रीडर जगूने नेल्यामुळे दामूचा अभ्यास अपूर्ण राहिला. | [2] |
| (iii) | सकाळच्या वेळी दामू व दिनू हे दोघे भाऊ अभ्यासाला बसले होते. दामू इंग्रजीतील शब्द पाठ करत होता तर दिनू भूगोलमधील खानदेशातील तालुके पाठ करत होता. दोघेही मोठमोठ्याने घोकत आपला | |

| | | |
|---|---|---|
| | अभ्यास करीत होते. दिनू 'खानदेशातील तालुके - धुळे, अमळनेर, एरंडोल, पाचोरे' असे मोठ्याने म्हणत होता. दामूसुद्धा 'एफ् ए बी एल ई' म्हणजे 'फेबल' असे जोरात घोकत होता. मधेच दामूने दिनूला दम दिला की, हळू घोक नाहीतर श्रीमुखात भडकावून देईन. दिनूने लगेचच त्याची आईकडे तक्रार केली. मधूनच एकमेकांना ते सुचना करत होते. मात्र एकमेकांशी स्पर्धा करत जोरात घोकल्यामुळे दोघांनाही त्रासच होत होता. पण त्याची पर्वा न करता दोघेही आपापला अभ्यास करीत होते.<br>अशाप्रकारे दामू व दिनू इंग्रजी व भूगोल या विषयांचा चढाओढीत अभ्यास करत होते. | [3] |
| (iv) | सकाळच्या वेळी दामू आणि दिनू एकत्र अभ्यास करीत होते. दामू इंग्रजी शब्द व त्यांचे अर्थ पाठ करीत होता. त्याचवेळी दिनू भूगोलाचा अभ्यास करीत होता. दिनू खानदेशातील तालुक्यांची नावे घोकत होता. त्यामुळे दामूला त्रास व्हायला लागला. तेव्हा दामूने त्याच्या श्रीमुखात भडकावून देण्याची धमकी दिली. तेव्हा दिनूने आईजवळ अशी तक्रार केली की, दादा त्याला उगाचच मारत आहे. तसेच दामूचे रीडर मिळत नव्हते. त्याबद्दल दामूने दिनूला विचारले, पण दिनूने नकार देताच दामू त्याच्यावर धावून गेला. त्यावेळी दिनूची पाटी फुटली तेव्हा दादाने पाटी फोडली अशी तक्रार दिनूने केली. रीडर शोधताना पिशवीच्या खेचाखेचीत पिशवीचा बंद तुटला, तेव्हा दादाने पिशवीचा बंद तोडला अशी तक्रार दिनूने आईजवळ केली. ज्याप्रमाणे दिनूने तक्रारी केल्या त्याचप्रमाणे आईजवळ स्वत:च्या बचावासाठी दामूनेही तक्रारी केल्या की मी मारत नाही, दिनूच मोठमोठ्याने ओरडतो आहे आणि अभ्यास करू देत नाही शिवाय रीडरही दिनूने लपविले आहे.<br>अशाप्रकारे दामू व दिनू परस्परांच्या वरील तक्रारी आईजवळ करीत होते. | [3] |
| **A.12** | Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :<br>खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.<br>**विठ्ठल तो आला... आला** | |
| (i) | देवळातील सर्वांना खरे भक्त अजिबात म्हणता येणार नाही. कारण देवळात आलेला वकील खोटे दस्तऐवज करतो. डॉक्टर हा खरे तर गुरांचा डॉक्टर पण नाटक कंपन्यांची कॉन्ट्रॅक्ट घेऊन दवाखान्याला मदत म्हणून उरलेले पैसे खिशात टाकतो. शेटजी तांदळाच्या पोत्यात खडे मिसळून ग्राहकांची फसवणूक करतात. शेटजी खोट्या नाण्याची ओवाळणी टाकतात. सखूबाई सुनेला छळतात. भटजी देवाला काळोखात ठेवतात. दह्याची वाटी म्हणून चुन्याची वाटी तोंडाला लावतात त्यामुळे विठ्ठलाच्या तोंडाला फोड येतात. ते कधी गाभाऱ्यातील घाण साफ करत नाहीत. याचबरोबर हे सगळे ढोंगी भक्त स्वत:च्या मोठेपणात गुंग असतात. देवासमोरही आपले हेवेदावे करत असतात.<br>वरील सर्व कारणांमुळेच देवळात जमलेल्या सर्वांना खरे भक्त म्हणता येणार नाही. | [2] |
| (ii) | विठ्ठल भटजींच्या तक्रारी करताना म्हणतात, मंदिरात दिवे नसल्याने काळोखात उभे राहावे लागते. नैवेद्याला दह्याची वाटी म्हणून चुन्याची वाटी लावल्याने तोंडाला फोड येतात. रोज साखरफुटाण्यांचा आणि डाळ-मुरमुऱ्याचा नैवेद्य देऊन स्वत: घरी मात्र भजी-चिवडा खातात. तुळशीची पानं घातलेले पाणी दोन-तीन युगात न घासलेल्या पंचपात्री आणि पळीने तीर्थ म्हणून देतात. स्वत: मात्र चहा कॉफी पिऊन स्वत:ची कापडे परटाकडे धुवायला देतात पण विठ्ठलाचे पितांबर धुत नाहीत.<br>अशाप्रकारे विठ्ठल भटजींच्या तक्रारी मांडतात. | [2] |
| (iii) | विठ्ठल मंदिरात जमलेले सर्व भक्तगण मोठमोठ्याने बेसूर आरती म्हणतात. कोणीतरी नगारा वाजवतो. या सर्वांचा विठ्ठलाला त्रास होतो. तेव्हा ते ''माझे कुणीतरी ऐका'' असे म्हणतात. पण कोणीच ऐकत नाहीत. | |

मंडळी बेंबीच्या देठापासून ओरडत आरती संपवतात. आरतीनंतर आपसात वाद घालतात. या वादावर भटजी त्यांना गप्प बसवतात तेव्हा त्रासलेले विठ्ठल ओरडून ''अहो, जरा इकडे लक्ष द्या'' असे म्हणतात. त्यावर भटजी शेटजींना चिडून म्हणतात ''ओरडू नका. दोनच हात आहेत मला. विष्णूसारखे चार नाहीत.'' यावर शेटजी चिडून भटजींना म्हणतात, ''माझ्यावर कशाला टाफरता.'' मग भटजीही रागवून शेटजींना म्हणतात, ''निदान देवळात तरी खोटं बोलू नका.'' त्यावर शेठजी चिडून म्हणतात, ''भटजी, तुमचा उद्धटपणा वाढलाय. आषाढी लाभली म्हणून चिडून जाऊ नका. ही पुण्याई तुमची नाही, विठ्ठलाची आहे.'' यावेळी विठ्ठल भयंकर चिडतात व म्हणतात, ''अरे, माझ्याकडे कोणी पाहील का ? अहो मी जन्माला घातले तुम्हाला.'' यावेळी भटजींना वाटते की हे मास्तरच म्हणाले. म्हणून रागावलेले भटजी मास्तरांच्या मुस्काटात मारतात. **[3]**

(iv) समाजातील खोटेपणा, स्वार्थीपणा तसेच ढोंगीपणाचे लेखकाने वर्णन केले आहे. लेखक म्हणतात, प्रत्यक्ष देव आला तरी देवाला वेड लागेल अशी आजकाल परिस्थिती निर्माण झाली आहे. भक्तीचा बाजार मांडताना स्वत:ला भक्त म्हणवणाऱ्या लोकांचे देवाकडे लक्षच नसते. त्यावेळी आंधळ्याच्या व्यक्तिरेखेतून लेखक भक्तांचा दांभिकपणा उघड करतो. सर्व भक्तगण आपल्याच विश्वात रममाण होतात आणि खऱ्या विठ्ठलावर अविश्वास दाखवतात. प्रत्यक्ष विठ्ठल समोर असूनही विठ्ठलाच्या खरेपणाचा पुरावा मागतात. स्वत:च्या व्यवसायातील अडचणी सांगतात. पण अंध असूनही विठ्ठलावर माया करणाऱ्या, परिस्थितीचा सकारात्मक विचार करणाऱ्या आंधळ्याला विठ्ठल दिसतो, खऱ्या अर्थाने कळतो पण डोळसांना मात्र समोर प्रत्यक्ष उभा असूनही विठ्ठल कळत नाही. ते सारे स्वार्थाने आंधळे झालेले असतात.

अंत:करणापासून भक्ती केली, कुठलीही अपेक्षा न करता साद घातली तर परमेश्वर आपल्यासमोर उभा राहतो. प्रामाणिकपणे आपले कर्तव्य केले तर परमेश्वराची आपल्याला संगत लाभते हेच लेखक येथे सांगतात. **[3]**

**A.13** Read the extract given below and answer in **Marathi** the questions that follow :

खालील परिच्छेद वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा :

**चार दिवस**

(i) शकूच्या कल्पनेतली छोटी बेबी अतिशय गोजिरवाणी, गोंडस आणि सुरेख अशी आहे. ती फार गुंडगिरी करते. ती हुबेहुब शकूसारखी दिसत असून 'याऽईऽऽ' 'याऽईऽऽ' करत रडते आणि झोप झाल्यानंतर सारखी मस्ती करत असते.

अशाप्रकारे शकूच्या कल्पनेतील बेबीचे वर्णन केले आहे. **[2]**

(ii) अचानक नोकरी गेल्यानंतर ऑफिसमध्ये भेट द्यायला गेलेल्या शकूची सगळ्यांनी आपुलकीने विचारपूस केली. तेव्हा तिने सगळ्यांना आश्चर्याचा धक्का दिला. तो म्हणजे तिच्या लग्नाचा. तिच्या म्हणण्यानुसार त्यांनी तिच्या लग्नाची संधी गमवली. खूप मोठा समारंभ झाला. बॅण्ड, वरात आणि पार्टी तसेच ताजमध्ये स्पेशल डिनर सगळ्यांसाठी होते. तिने बोलता बोलता असा ही निष्कर्ष लावला की, आहेराच्या धास्तीमुळे ऑफिसातली माणसे आली नसावी पण तिने सर्वांना आहेर मिळावा या अपेक्षेने न बोलवता एक मित्र म्हणून बोलवले होते.

अशाप्रकारे शकूने ऑफिसमधल्या लोकांना आपल्या लग्नाविषयी माहिती सांगितली. **[2]**

(iii) सकाळचे दहा वाजले की शकूचे मन रस्त्यावर चालू लागत असे. स्टेशनवर येत गडबडीने गाडीत चढत सभोवताली पाहात ऑफिसामध्ये जात असे. हा तिच्या आयुष्याचा एक मोठा भाग बनला होता. तिच्या आयुष्यातील सात वर्ष तो रस्ता, प्लॅटफॉर्म, गाडी, ऑफिस यातच ती जगली. टायफॉइडचे दोन महिने सोडले तर तिच्या मनात फक्त ऑफिसची आठवण यायची. ते ऑफिस, ती गाडी, तो प्लॅटफार्म, तो ठरलेला रस्ता, त्या रस्त्याची वळणे आता सगळे बदलले. आता फक्त ऑफिसच्या आठवणी राहिल्या होत्या.

अशाप्रकारे सकाळचे दहा वाजले की शकूच्या मनात वेगवेगळ्या आठवणी यायला लागतात. **[3]**

| | | |
|---|---|---|
| (iv) | शकूविषयीचे मत व्यक्त करताना तिच्या सहकाऱ्यांच्या बोलण्यातून असे जाणवून आले की, शकू नसल्याने ऑफिसमध्ये तो पूर्वीचा जिवंतपणा गेला. हसणं, किलबिलणं संपलं. तिच्यामध्ये गर्व नव्हता. कधी ओरडणं नाही. प्रत्येकाला कामात मदत करणं. घरातली एकुलती एक मिळवती मेंबर असून वडील आजारी, शिवाय चार धाकटी भावंडं, आई. आता तिची नोकरीही गेली. 'काय बरं होईल तिचं' याच विवंचनेत शकूचे सहकारी होते.<br>अशाप्रकारे शकूविषयीचे मत व्यक्त करताना तिच्या सहकाऱ्याच्या बोलण्यातून काळजी लक्षात येते. | [3] |

❖❖❖❖